# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ

On the web:
www.bmmonline.org

उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक
१९८१ – २००६ रौप्यमहोत्सवी वर्ष

फेब्रुवारी २००६
वर्ष २६, अंक २


## MAIYTRA 2006 IN CHICAGO





Over the past 11 years, Maharashtrian youth have been coming together every other year to promote cultural, academic and professional development as part of “MAIYTRA,” which stands for “Maharashtrian Association of Indian Youth Together Representing America.” BMM of North America brings MAIYTRA to you. This event is geared towards providing leadership and growth opportunities for Marathi youth (age 18-35), as well as providing them a way to network and be inspired by the significance of our culture.

`Previous conferences have been held in Los Angeles, Detroit, New York, San Francisco, Toronto and Cleveland.

The next MAIYTRA will be held on July 1-3, 2006 in Chicago. Scheduling for the event includes social and educational programming through panel discussions, open-forums, networking opportunities, and cultural awareness activities, which include an overview on Marathi traditions and language. In addition, deserving youths will be awarded with educational scholarships and achievement recognitions. With an anticipated attendance of 400+ national and international Marathi youth, MAIYTRA has a powerful demographic.

We encourage you to send the younger generation to this significant event. Whether they are a college undergraduate student, graduate student, or professional, they will find seminar topics of their interest and attendees who share a common interest. Also, please encourage them to apply for a scholarship or highlight their major achievements by being a MAIYTRA “All*Star.”

Please visit the website: www.maiytra2006.org to learn more about the event, scholarship, and “All*Star” program. If your youth have any questions, they may contact Lakshmi Bhargave, President of MAIYTRA, at lakshmib.maiytra@gmail.com.

**Registration for the conference has already begun and is filling up fast (nearly 100 people have already registered for the convention). We encourage you to register your youth early to avoid a price increase. www.maiytra2006.org**





## बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

संपादक मंडळ
मोहन रानडे, विद्या हर्डीकर सप्रे, मधुवंती भाट

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय
144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-800-300-6430
E-mail: editorbmm@yahoo.com

मुद्रक आणि वितरक
दिलीप नामजोशी
Sir Speedy Printing, Blue Bell, PA


वर्गणीचे दर

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक | $20 | $30 | $40 |
| आजीव | $250 | $375 | $375 |

जाहीरातीचे दर

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान | $150 | $220 |
| अर्धे पान | $80 | $115 |
| पाव पान | $45 | $70 |
| अष्टमांश पान | $30 | $45 |

छोट्या जाहिरातीचे दर
(५० शब्दांची मर्यादा)

| | US | Can |
|---|---|---|
| दर शब्दास | $0.50 | $0.75 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिद्ध होते
- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही
- लिखाणाच्या निवडीचे आणि बदलाचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ई मेल कळविल्यास दिली जाईल
- साहित्य परत पाठवले जात नाही (पोस्टेज पाठवलेत तरी)


बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकरिणी
(२००५–२००७)
अध्यक्षः जगदीश वासुदेव, प्रिन्सटन्, न्यू जर्सी
कार्यवाहः कल्पना निमकर, कान्सास सिटी,
कोषाध्यक्षः गिरीश ठकार, पिटस्बर्ग,
सभासदः जगन्नाथ वाणी , कॅलगरी, कॅनडा
माणिक राणे, सिॲटल, वॉशिंग्टन
आशिष चौघुले, होकेसिन, डेलावेअर
किरण जोगळेकर, फिलाडेलफिया
नीला इनामदार, न्यू यॉर्क
माजी अध्यक्षः श्री ठाणेदार, सेंट लुईस
MAIYTRA मैत्र प्रतिनिधीः
लक्ष्मी भार्गवे, शिकागो
lakshmib.maiytra@gmail.com



प्रकाशक
बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
26 Rocky Hill Road, Princeton, NJ 08540
jvasudev15@yahoo.com
www.bmmonline.org


# AN APPEAL

NEED FINANCIAL HELP, NEARLY $15,000.00 IMMEDIATELY FOR MY HUSBAND MR. VIKAS R. DATE (AGE 58) WHO IS PERMANENTLY MENTALLY DISABLED (BRAIN DISORDER) SINCE 1996 WHO IS NOT ALLOWED TO WORK AT ALL BY GOVT DUE TO HIS CONDITION, ONLY ONE DISABILITY INCOME. TO SAVE TOWN-HOUSE FROM FORECLOSURE IN FEBRUARY 2006. ANY AMOUNT WILL BE APPRECIATED. PLEASE HELP ONE MARATHI FAMILY TO COME OUT FROM THIS FINANCIAL CRISES. EVEN IF WE GET LOAN FROM SOMEONE WE WILL REPAY AFTER SELLING THE TOWN-HOUSE.
KINDLY SEND THE CHECK IN THE OF NAME OF ALKA V. DATE ON TOP PRIORITY BASIS.

KINDLY GIVE US SUPPORT AS WE DO NOT HAVE ANY RELATIVES IN THIS COUNTRY.

ALKA V. DATE
7770 WOODWARD AVE
WOODRIGE, IL-60517
HOME -TEL-630-985-1640

Editor's Note: Neither BMM nor BMM Newsletter has verified this information as no information was available (even though we have contacted them) from Maharashtra Mandal, Chicago at the time of publication of the Newsletter. The appeal has been published as a humanitarian service and we sensed an urgency of time in her request. It is up to each individual to make the decision. Please contact Mrs. Date for additional details.

——————— Editor, BMM Newsletter


## INSURANCE & REAL ESTATE

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**
Tel: (901)757-8411 Fax : (901)759-1340
Cell: (901)230-3209

E-mail: sjthakur@bellsouth.net

# महत्त्वाकांक्षी तरूण गायिका प्रियांका टोपे



वरील शिर्षकावरून वाचकांना वाटेल की प्रियांकाला एक मोठी गायिका होण्याची महत्त्वाकांक्षा आहे. ती तर असणारच. पण त्याही पलिकडे जाऊन या केवळ १३ वर्षाच्या मुलीची खरी महत्त्वाकांक्षा माणुसकीच्या उच्च ध्येयाने प्रेरित होऊन लहान गरीब व गराजू मुलांना मदत करण्याची आहे. या प्रेरणेने व गायन कौशल्याने तिने नुकत्याच 'प्रियांजली ' आणि ”Rainbow – A Bridge to India” अशा दोन सीडी प्रसिद्ध केल्या आहेत यात संस्कृतसह अनेक भारतीय भाषांतील गीते गाऊन तिने आपल्या गानकौशल्याचा सुंदर नमुना प्रस्तुत केला आहे. मुंबईतील अनेक नामांकित संगीतकारांनी तिला या कामात मदत केली आहे

प्रियांकाला मी तिच्या लहानपणापासून ओळखतो. संगीताचे बाळकडू तिला घरातच मिळाले. तिचे आई–वडिल (गीता व अच्युत) संगीताची सेवा बरीच वर्षे करीत आहेत. न्यू यॉर्क येथील बृ. मंडळाच्या अधिवेशनात अमेरिकेचे राष्ट्रगीत प्रियांकानेच गायले होते. महाराष्ट्र फाउंडेशनच्या नुकत्याच पार पडलेल्या निधी संचय कार्यक्रमात प्रख्यात अभिनेते नाना पाटेकर यांनी तिचे कौतुक करून तिला आशिर्वाद व शुभेच्छा दिल्या. वृत्ताच्या वाचकांना एक नम्र विनंती की त्यांनी प्रियांकाच्या वेब साईटला (http://www.priyankatope.com) भेट देऊन तिच्या सीडी विकत घ्याव्यात आणि लहान गरजू मुलांना मदत करण्याच्या तिच्या महत्त्वाकांक्षेला मदत करावी .

**रवींद्र राजे**
स्प्रींग फील्ड, न्यू जर्सी
rraje@liu.edu

---

Dear Music Lovers,

Each time I visit India, it is an unforgettable trip. I receive love and affection from my family and friends. The culture, the music, and the simple minded gleeful spirit of the Indian people astounds me. But like night and day, there is also sadness and desperation. The sadness which exists in the eyes of the little children on the streets has left an indelible impression on me. I could not overlook the kids in the streets; kids without adequate food, clothes, and shelter; and no hope for schooling. Then, I realized that this problem was not unique to India, but it existed right here at home, in America. Although in different forms, this situation exists all over the world. I thought to myself, "How come no one does anything for these kids?" Something had to change: Mahatma Gandhi said once "You must be the change you want to see in the world." I decided to use my musical abilities to do what I can for these children, With the support of my parents, teachers, accomplished Indian musicians, and my confidence in YOU, I dedicated the last 9 months in producing two CD albums, ‘Priyanjali’ and ‘Rainbow: A Bridge to India’.

My name is Priyanka Tope. I am 13 years old, and live on Long Island, NY. I want to help kids who are in need all over the world. The entire cost of producing these two CD albums is covered by a donation from my parents. The money earned from the sale of these CDs is being donated to children's causes. You know how inexpensive it is in most parts of the world to cover the basic needs of children. I am learning about giving. Whatever you give comes back ten-fold.

You can help support this cause, by buying these CD albums. You can be a:

Donor ..................... $31 (1 set of CDs)
Supporter................. $61 (2 sets of CDs)
Believer .................. $81 (3 sets of CDs)
Blesser......................$101 (4 sets of CDs)

Or, you can buy individual albums by visiting my web site. You can either buy on-line or you can mail your checks to: PriTej Productions, Inc., P.O. Box 87, Middle Island, NY 11953. For more information and updates, or to purchase more CD albums, please visit my web site http://www.priyankatope.corn.

Charities we currently donate to include, UNICEF, CRY-America, American Red Cross, America's Second Harvest, Maharashtra Foundation, Long Island Mentoring Partnership, and several other organizations in the US and abroad. If you would like us to donate to other charitable organizations in good standing, in the USA or abroad, which are dedicated to children's causes, and you would like to be a Blesser and help us, we will donate the funds generated by our efforts together (through sale of these CD albums, benefit concerts, events, and any other ideas you might have) to the children's cause of your choice.

Sincerely,

**Priyanka Tope**

# मराठी मंडळांतून फेरफटका

## बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका आयोजित दौरा

बृहन्महाराष्ट्र मंडळ, तर्फे गदिमा प्रतिष्ठानच्या चैत्रबन पुरस्काराने सन्मानित कलावंत श्री संजय उपाध्ये यांचा 'गप्पाष्टक' व इतर कार्यक्रम उत्तर अमेरिकेत एप्रिल ते जून या काळात आयोजित करण्यात येत आहेत. काव्य, साहित्य, राजकारण, समाजकारण, संस्कृती, अध्यात्म, संगीत आणि विनोद इत्यादी विषयांवरील अडीच तासांचा गप्पांचा कार्यक्रम असे 'गप्पाष्टक'चे स्वरूप असेल. संजय उपाध्ये त्याशिवाय 'हसवाई', गीता प्रवचन (मराठी व हिंदी) आणि जादूचे प्रयोग व शॅडो प्ले हे कार्यक्रम सुद्धा करतात. काही मराठी मंडळांनी त्यांच्या कार्यक्रमांच्या तारखा निश्चित करण्यास सुरूवात केली आहे (डेट्रॉईट – १ एप्रिल न्यूयॉर्क १० एप्रिल). तेव्हां आपल्या मंडळात हा कार्यक्रम करण्याची तारीख आजच ठरवा

संपर्कः
मयूर देवल (३०१-९२६-८६३६),
आशिष चौघुले (३०२-५५९-१३६७)
अथवा कल्पना निमकर (९१३-३९३-०४८४)

– संक्रातीनिमित्त फिलाडेलफिया मराठी मंडळाने 'पक पक पकाक' तर बे एरिया मराठी मंडळाने 'ब्लाईंड गेम' हा चित्रपट दाखवला.

– सहावे युरोपियन मराठी अधिवेशन थिएटर हॉटेल मध्ये २८ ते ३० जुलै, २००६ रोजी अलमेलो, नेदरलंड येथे भरणार आहे. त्यासाठी महाराष्ट्रातून शास्त्रज्ञ डॉ जयंत नारळीकर, समाजसेवक डॉ. प्रकाश व डॉ. शीतल आमटे, सिनेनट अरूण नलावडे व मंजिरी धामणकर आणि संगीतकार सलील कुलकर्णी हे पाहुणे उपस्थित राहणार आहेत. लंडन आणि मँचेस्टर येथील मराठी मंडळी एकांकिका सादर करतील. अधिक माहितीसाठी www.ems2006.nl या वेब साईटला भेट द्यावी.

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
**जाहीरातीसाठी उत्तम माध्यम**
**माफक दर**

**वृत्ताचे सध्या ३२० लाईफ मेंबर आहेत. आपण वार्षिक वर्गणीदार असाल तर फक्त २५० डॉलर्स भरून लाईफ मेंबर व्हा.**

RESIDENTIAL/COMMERCIAL
BUSINESS BROKER

RAY'S
REAL ESTATE

MR.
VAISHAMPAYAN

24655 SOUTHFIELD RD
SUITE #106
SOUTHFIELD, MI 48075

Phone: 248 905-5667
Fax: 248 443-4978



WE ARE A FULL SERVICE REAL ESTATE COMPANY.

WE ARE PLEASED TO ASSIST YOU WITH THE TASK OF SELLING AND ALSO ACQUIRING NEW PROPERTIES, INVESTMENTS AND BUSINESSES.

WE HAVE 20 YEARS OF EXPERIENCE IN REAL ESTATE CONSULTING.

WE OFFER AGGRESSIVE SUPPORT ASSISTING YOU WITH ALL OF YOUR REAL ESTATE RELATED NEEDS.

FOR MORE INFORMATION PLEASE CALL US DIRECT
ANGELA AT 313 999-2761
RAY AT 248 217-5224

# मराठी कलाकारांचे दौरे

## तरूण गायक राहूल देशपांडे



प्रसिद्ध गायक डॉ. वसंतराव देशपांडे यांचा नातू राहूल देशपांडे मार्च ते मे २००६ या काळात अमेरिकेच्या दौऱ्यावर येत आहे. मराठी रसिकांना वसंतरावांच्या गायनाने मोहिनी घातली होती मग ते नाट्यसंगीत असो अथवा शास्त्रीय संगीत. 'कट्यार काळजात घुसली' हे नाटक पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या संगीताने आणि वसंतरावांच्या भूमिकेने अजरामर झाले. १९८० साली वसंतरावांनी उत्तर अमेरिकेचा दौरा केला होता. तो अजूनही कित्येकांच्या स्मरणात आहे. त्यावेळी त्यांचा नातू राहूल याचा नुकताच जन्म झाला होता.

आता २६ वर्षानंतर तो आपल्या आजोबांचा वारसा घेऊन अमेरिकेतील रसिकांसमोर प्रथमच येत आहे . आजोबांकडून त्याला संगीताचा वारसा मिळाला परंतु शिक्षण घेण्याचे भाग्य मिळाले नाही. पुण्यातील ख्यातनाम शिक्षक गंगाधर पिंपळखरे यांचेकडे त्याचे संगीताचे प्राथमिक शिक्षण झाले. सुरेश सामंत यांचेकडून तो तबलाही शिकला. सध्या दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमात (नक्षत्राचे देणे, सूर ताल) तो नियमित दिसतो. संगीताची अनेक पारितोषिके व पुरस्कार त्याने मिळवले आहेत. गेल्या वर्षी सवाई गंधर्व महोत्सवात गाण्याची संधी त्याला मिळाली. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांचा दौराही त्याने नुकताच पुरा केला. अमेरिकेच्या दौऱ्यात शास्त्रीय गायन, नाट्यसंगीत, गझल, भक्तिगीत असे अनेक प्रकार सादर करण्याचा त्याचा मानस आहे. वसंतरावांच्या गानशैलीवर आधारित 'शुभ्र फुलांची ज्वाला ' हा कार्यक्रम सुद्धा तो करतो.



निखिल फाटक



राजीव परांजपे

या दौऱ्यात राजीव परांजपे - हार्मोनियम व निखिल फाटक - तबला हे कसलेले साथीदार त्याला साथ करतील . दौरा १० मार्च ते १४ मे या काळात होईल. दौऱ्याची सुरूवात १० मार्च डलास, ११ मार्च ह्यूस्टन, १७ टूसान १८ फिनिक्स अशी होईल एप्रिल ७, ९, १४, १६ व मे ५, ६, ७ या तारखा फक्त शिल्लक आहेत. आपल्या शहरात कार्यक्रम ठरविण्यास नारायण सरदेसाई यांना फोन करावा (८१७-२९७-९६६६)


**MATRIMONIAL**

Correspondence invited from a suitably qualified male for a, 43yrs, 5' 2", 125 lb, Engineer, divorced, Maharashtrian female settled in US,
E-mail: szyxpt@yahoo.com




राकेश चौरासिया



अभिजित पोहणकर



विजय घाटे



आश्विनी भिडे- देशपांडे

कोलंबस ओहायो येथील स्वरांजली या संस्थेतर्फे एप्रिल ते जून या काळात राकेश चौरासिया (बांसरी) व अभिजित पोहणकर (सिंथेसायझर) या वाद्यांचे जुगलबंदीचे कार्यक्रम होणार आहेत. तबल्याच्या साथीला प्रसिद्ध तबलावादक विजय घाटे असतील.

राकेश चौरासिया हे प्रसिद्ध बांसरी वादक हरीप्रसाद चौरासिया यांचे पुतणे तर अभिजित पोहणकर हे प्रसिद्ध गायक अजय पोहणकर यांचे चिरंजीव. प्रसिद्ध संतूरवादक शिवकुमार शर्मा यांचेकडून त्यांनी शिक्षण घेतले.

विजय घाटे हे प्रसिद्ध तबलावादक पंडित सुरेश तळवलकर यांचे शिष्य. भारतातील सध्याच्या आघाडीच्या तबलावादकात त्यांची गणना होते. राकेश व अभिजित यांनी मिळून अनेक कार्यक्रम यापूर्वी केले आहेत. तसेच त्यांच्या जुगलबंदीची सीडी प्रकाशित झाली आहे.

आश्विनी भिडे- देशपांडे या सध्याच्या आघाडीच्या गायिका मानल्या जातात त्यांचे कार्यक्रम मे - जुलै या काळात होतील. त्यांची आई माणिक भिडे यांचे कडून त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. विश्वनाथ व सीमा शिरोडकर हे अनुक्रमे तबला व हार्मोनियमवर साथ करतील.

वरील दोन्ही दौऱ्यांचा संपूर्ण कार्यक्रम पुढील महिन्यात वृत्तात प्रसिद्ध करू.

सप्टेंबर ते नोव्हेंबर या काळात स्वरांजली तर्फे सतारवादक शहीद परवेझ आणि गायक सावनी शेंडे यांचा दौरा आयेजित केला जाणार आहे. तसेच मे महिन्यात व्हायोलिन वादकांच्या तीन पिढ्या (एन्. राजम, मुलगी संगीता शंकर व नाती रागिणी व नंदिनी शंकर असा दौरा होणार आहे.
अधिक माहितीसाठी शिव हिरेमठ यांचेशी संपर्क साधा. फोन - 740-815-9615; by e-mail at hiremath-slk@sbcglobal.net

# पुस्तक परिक्षण – "परत मातृभूमीला"– नीलिमा कुलकर्णी, न्यू जर्सी

अल्बनी, न्यूयॉर्कचे सुधीर कुलकर्णी यांचं दुसरं पुस्तक 'परत मातृभूमीला' ग्रंथालीने प्रकाशित केलं. अनिवासी भारतीयांच्या किंवा त्यांच्या भोवतालच्या व्यक्तींच्या आयुष्यातील प्रसंगांवर आधारित सहा कथांचा हा कथासंग्रह आहे.

परदेशात स्थिरावलेले भारतीय आपल्या आईवडीलांना हक्काने इथे बोलावतात पण त्या आईवडीलांचं स्वतःचं जग मागे भारतात असतं. त्यांच्या मनाची तगमग, "परत मातृभूमीला" जाण्याची लागलेली ओढ पहिल्या कथेत सहजपणे मांडली आहे. मनोगतात लेखक म्हणतात, "बऱ्याच अनिवासी भारतीयांचं स्वप्न आहे की कधीतरी आपण आपल्या जन्मभूमीला परत जाऊ. ह्या कारणास्तव कथासंग्रहाचे शीर्षक निवडले आहे .. "परत मातृभूमीला "

दुसरी कथा MCATच्या परिक्षेत हाय टेक कॉपी करणाऱ्या दुसऱ्या पिढीतल्या एका मुलाची आहे. मुलाने डॉक्टर व्हावं हे स्वतःचं स्वप्न मुलावर लादणाऱ्या पालकांचा मानसिक संघर्ष आणि मुलावर येणारा दबाव विचार करायला लावणारा आहे. कथेच्या शेवटी श्री. कुलकर्णी म्हणतात, "पुराच्या प्रचंड दबावामुळे काही वेळ धरण कोसळण्याची शक्यता असते त्या पाण्याला वेगळी वाट – सांडवा – बांधून दिला तर धोरणाला धोका नसतो"

"नकली खून " ही कथा शीर्षकातच सगळं सांगून जाते. वेगळ्या प्रकारच्या अनिवासी भारतीयांच्या समाजाचं हे चित्रण "मिसिसिपी मसाला"तल्या पात्रांची आठवण करून देते. वेगळं शीर्षक देऊन कथेत सस्पेन्स वाढवला असता तर ती जास्त प्रभावी झाली असती असं मला वाटतं.

विषयांची विविधता आणि चाकोरीबाहेरचे विषय हे पुस्तकाचं वैशिष्ट्य आहे. आत्तापर्यंत माझ्या वाचनात न आलेला भारतीय मुलाला दत्तक घेण्याचा विषय – तो संघर्ष "वंशवेल" या कथेत आहे. तर नुकत्याच भारतातून आलेल्या 'डेट' शोधता शोधता चुकींच्या कल्पना घेऊन "एस्कॉर्ट गर्ल"च्या गोत्यात आलेल्या तरूणाची 'सल्ला' ही कथा आहे. शेवटची कथा 'हलकी फुलकी' बऱ्याच वर्षां पूर्वी लिहिलेली कथा परत मातृभूमीला घेऊन जाते.

श्री. सुधीर कुलकर्णी यांचं लिखाण वैचारिक आहे. कथेतील पात्रांच्या संवादांमधून एकेका विषयाच्या उलटसुलट बाजू ते पुढे मांडतात. त्यामुळे त्या लिखाणाला समतोलपणा येतो. मग ते दत्तक घेणं असो, मुलाचं करिअर ठरवणं असो किंवा भारतात परत जाण्याचा निर्णय असो. वेगवेगळ्या अंगांनी समस्येवरचे विचार मांडलेले दिसतात.

परदेशातील भारतीय म्हणजे केवळ नोकरीसाठी आलेले अनिवासी भारतीय नव्हे तर दुसऱ्या पिढीतील अमेरिकन भारतीय, इथे थोड्या काळासाठी आलेले 'FOB' किंवा आईवडील आणि मोटेल चालवणारे धंदेवाईक भारतीय अशी पात्र निवडल्याने या छोट्याशा कथासंग्रहात विविधता आली आहे. त्यानं हे पुस्तक वाचनीय झालं आहे.

श्री. सुधीर कुलकर्णी यांचं मनापासून अभिनंदन.

पुस्तक – परत मातृभूमीला
लेखक – सुधीर कुलकर्णी, अल्बनी, न्यूयॉर्क, skul1@yahoo.com
प्रकाशक – ग्रंथाली


**नीलिमा कुलकर्णी,**
Clakrksburg, NJ
neelimakulkarni@yahoo.com



**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**8 Days—9 Nights Hawaii Tour package in July**
**SOTC Tours to Europe**
**Tickets on Lufthansa, British Airways, Air France, Air India, Kuwait Air & many more**
**For all Domestic & International Travel**

**eMail: comforttrvl@netscape.net**

**Please call - SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**
**FAX: 732-767-3138**



**FOR FRIENDSHIP, COMPANIONSHIP LEADING TO MARRIAGE**

If you are a single unattached , a positive blend of East & West, educated, easy going, caring, mature gentleman, 58 –68 with good sense of humor,
Write to: bgtbatma@yahoo.com to a Maharashtrian lady from Southern California, widow, 63, 5' 6", with above qualities.



**MATRIMONIAL**

Correspondence invited from a suitably qualified male for a Maharashtrian brahmin girl, cheerful, congenial, attractive, 25, 5'1". Brought up and educated (MA – Math) in Mumbai but studying (B. Ed. UBC) in Canada on a Student Visa since Sept. 2004. The prospective suitor must be under 30 years old, at least 5'6", educated, conversant with Marathi/culture and be willing to settle in Canada/US. For additional information and exchanging bio-data including photo,
contact: murlipen0230@shaw.ca

# उत्तर रंग

*हे सदर जानेवारी २००४ पासून वृत्तात प्रसिध्द होत आहे. त्याला लोकांचा चांगला प्रतिसादही मिळत आहे.*

उत्तररंग या सदरासाठी आपले लिखाण (मराठी अथवा इंग्रजी) पुढील पत्त्यावर पाठवावेः

Ashok Sapre 1246 El Paseo, La Habra Heights, CA 90631. *Ashok.sapre@verizon.net*

Last year the first conference Issues, Aspirations and Options in Senior Years for Indo-Americans was held in February 2005 in Southern California. We are pleased to announce that the Second Conference will be held jointly with a New Jersey Organization headed by Mr. Jagadish Vasudeo.

Conference Dates: July 22-23, 2006

Venue: Middlesex County Fire Academy, Sayreville, New Jersey

***Mark your calendar and Stay Tuned!***

## A resolution for New Year!

Our lives are filled with making plans… for our education, wedding, new home, college tuitions, vacations and retirement. We do this to fulfill our dreams, protect our family and to secure our peace of mind. **Organizing vital information is one more way of securing peace of mind…** Give this gift to yourself and ***to your family***! Here are some examples: (please add your own ideas to this list and share with other readers if you wish !) ----- *Ashok Sapre*

1. **Vital Statistics**:
   Name, address, Telephone Number(s), Contacts in USA and in other countries, Emergency contacts, Social Security Number, Driver's License Number, passport Information, citizenship information, Date of Birth, Birth Place, Name and birth place of father, name and birthplace of mother, Maiden name of mother, occupation and employment related information, Marital Status, similar information about the spouse, Maiden Name if applicable, Date and place of marriage etc.

2. **Information about the important documents and where to locate them**:
   Bank accounts( Name and addresses of Banks, Safety Deposit Box locations etc.),
   Birth Certificates of the family members, Marriage Certificate, Deeds and titles, Mortgages and notes, ), information about any other type of properties in USA and outside.
   Credit cards and numbers, Computer passwords, Last will and Testament, Income tax records, Life Insurance Policies, Name, address and telephone of the Executer; education related information (certificates, mark lists)

3. **Financial Information**:
   Financial Institution, Account Information, Telephone, Beneficiary information ( if applicable) of IRA accounts, 401K Accounts, mutual funds, brokerage accounts, other investments, loans and mortgage.

4. **Medical Information**:
   Doctors: Name and type, address and telephone.
   Hospitalization Information:
   Hospital name and address., insurance policy, group number, membership number.
   Hospitalization history.
   Where to find medical records.
   Information about Medical history and allergies.
   Information about organ donation.
   Life insurance and other policies : Company, policy number, name of insured, amount of benefit, beneficiary information, location of the policy etc.

5. **Family Heritage**:
   Family trees, memoirs, significant events, historical family photos, family medical history..

# सखी शेजारिणी

अशीच एक बाळपणची मैत्रीण. तिला आपण उषा म्हणूया. अबोल, निरागस, बुध्दिमान, कलावंत, लोभसवाणी. सुखवस्तु, बाळबोध घरांत वाढलेली. माणसांतला वाईटपणा म्हणजे काय असतो, याचा जरासुध्दाही गंध नसलेली. हिला शिकायची आवड म्हणून आईवडिलांनी हिच्या धाकट्या बहिणीची लग्ने हिच्या आधी करून दिलेली. हिच्या जन्मपत्रिकेत मंगळ, मूळ नक्षत्र वगैरे भानगडी. त्यांत चष्म्याची भर! म्हणजे तिचं लग्न जमण्याच्या दृष्टीने सगळाच प्रतीकूल मसाला. लग्नाच्या मासळीबाजारांत सगळा बाह्यरूपावरच भर. हिच्यातल्या गुणांकडे कोण लक्ष देतो? शिवाय तीस वर्षापूर्वी तेवीस चोवीस वर्षाची मुलगी म्हणजे समाजाच्या दृष्टीने ती घोडनवरीच होती.

एखाद्या गरीब कुटुंबातल्या शिकलेल्या उमद्या तरुणाच्या आयुष्याचं आपण सोनं करावं अशी उषाची मनापासून इच्छा. आपल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा ही पण आकांक्षा. तसा गरीबीत वाढलेला, स्कॉलरशिपवर शिकलेला, तडफदार, धडपड्या तरूण, नवरा म्हणून तिला मिळालाही. गरीबीत, कष्टांत दिवस काढायची तिची मनाची पुष्कळ तयारी होती. कधीही बिचारीनं कसलीही तक्रार, कुरकुर केली नाही. नवरा देईल त्या गोष्टीत, देईल तेवढ्या पैशांत ती भागवे व समाधान मानून राही. लग्नाच्या साड्या घ्यायलाही त्याने कर्ज काढलेन होते, ते फेडण्यासाठी ही धुणं भांडीही घरीच करे. घरांत गॅसही नव्हता सुरवातीला तर साध्या वातीच्या स्टोव्हवर हिने वेळ मारून नेली. त्याच्या स्वभावाचा मात्र तिला पत्ता लागत नव्हता. संतापी, संशयी, मत्सरी, अतिरेकी. कधी कुणाशी त्याचे पटायचे नाही. नातेवाईक, शेजारी पाजारी, कामावरची माणसे- सर्वांशीच तो भांडणे करी. त्यांत त्याच्या मत्सरी आई व बहिणीकडून होणाऱ्या छळाची भर. भरीस भर म्हणजे हिला दोन्ही मुलीच झाल्या, मुलगा नाही याने आगीत तेलच ओतले गेले. वास्तवतेच्या तप्त वाळवंटाल्या झळा तिला सहन होईनात. तरीपण ती धैर्याने संसार चालवत होती. लहान मुलीकडे पाहून, त्याच्या भविष्याचा विचार करून दुःख सोसत होती. आईवडिलांनाही त्रास नको म्हणून तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत होती. तेही जमेल तशी नि तेवढी त्यांना आर्थिक व इतरही मदत करतच होते.

अमेरिकेत आल्यावर आता तरी तो नव्या वातावरणांत सुधारेल याची आशा ठेवून होती. थोडी नाखुषीनेच उषा इथे आली होती. कारण हा देश म्हणजे सोनेरी शाप आहे, इथे आलं की लोकांचे घटस्फोट होतात वगैरे धोक्याचे लाल कंदिल त्याने तिला दाखवले होतेन्. त्यांत इथे कोणी जवळ नात्यागोत्याचं नाही. ह्याला कोणी घरी आलेले आवडत नसे की कोणाकडे जायला आवडत नसे. तिने कोणाला कधी फोन केलेलाही खपत नसे. भारतांत भेटीला जाणेही अगदी विरळाच. त्याच्या औरंगजेबी, हिटलरी अंमलाबरोबरच अशा एकांतवासाचीही तिला संवय झाली. मुलीही अगदी त्याला घाबरून असत. तरीपण त्याने वेळप्रसंगी सहा सहा मैल बर्फात वगैरे चालून काढलेल्या कष्टांकडे पाहून ती त्याची कीव येऊन त्याच्यात आज ना उद्या बदल होईल, अशी आशा ठेवून होती. एकीकडे स्वतःचेही शिक्षण, ट्रेनिंग चालू ठेवले होते. मिळेल ती पार्ट टाईम नोकरी, लहान सहान स्वतंत्र उद्योग करत होती व त्याच्या उत्पन्नाला हातभार लावत होती. त्यांत त्याच्या मधून मधून नोकऱ्या जाणे, नोकरीच्या निमित्याने वेगळ्या गावी, तर कधी वेगळ्या प्रांतांत राहाणे ह्या गोष्टींनी दोघांतले अंतर वाढतच गेले, दोघांतला संवादही बंद पडायची वेळ आली. त्याचे हिला व मुलींना घालून पाडून बोलणे, सतत हिच्या घरच्यांना नांवे ठेवणे, आदळ आपट करणे, कपडे वगैरेलाही पैसे न देणे या गोष्टींनी तिचा जीव अगदी कावून गेला होता. मानसिक छळापायी एका छताखाली रहाणेच सर्वांना अशक्यप्राय होऊन बसले. तिने त्याला फॅमिली, मॅरेज कौसलींग करायला सुचवले, ते त्याने धुडकावून लावले. शेवटी तिने स्वतः तीन वेगवेगळ्या कौसलर्सशी बोलून घेतले. सर्वांनीच तिला घटस्फोट घेण्याविषयी सल्ला दिला. तरी तिचे मन धजत नव्हते.

आई, वडिल, बहिणी, भाऊ यांची काळजी, सामाजिक प्रतिष्ठा, स्वतःची व मुलीची आर्थिक चिंता, व त्यांचे भवितव्य सर्व गोष्टींचा विचार करून निर्णय घ्यायला तिला तब्बल पांच वर्षे लागली. भारतीय म्हटले, दोघांच्या लग्नाआधिच्या आर्थिक परिस्थितीत अंतर फार होते. अमेरिकन्स म्हटले, दोघे एकमेकांपासून फार वर्ष दूर राहिले. खरी गोष्ट ही की त्याचा स्वभाव तिला कधी उमगलाच नाही. त्याच्याशी डांवपेचाने, डिप्लोमसीने कसे वागावे हे तिला कधी कळलेच नाही.

आता उषा व तिच्या मुली छान निरोगी जीवन जगताहेत. सर्वांच्या, अगदी त्याचीही - करीयर्स जोमांत आहेत. पण मुलींना अजूनही पुरूष ह्या शब्दाविषयीही घृणा, तिरस्कार आहे. तिच्या आयुष्यांत तो नाही म्हणून आज ती तिचे सगळे कला गुण जोपासू शकते आहे (कि तो नाही म्हणून जीवनांत निर्माण झालेली पोकळी भरून काढायचा तो तिचा एकमेव मार्ग आहे?) आता पन्नाशीच्यापुढे तिचे वय आहे. वीस वर्षाच्या डळमळीत संसारांतही ही त्याच्या प्रेमांत पडली. दुसऱ्या पुरुषाचा स्वप्नातही विचार तिला अशक्य नि असह्य होतो. रामाच्या सीतेप्रमाणे वेडी एक पतित्व, पातिव्रत्य जपून आहे. मंगळसूत्रही खुळीने जपून ठेवले आहे.

एक ना एक दिवस त्याला उपरती होईल, म्हातारपणांत त्याला आपली गरज पडेल, तेव्हां आपणच त्याची सेवा करू, अशी ती आशा बाळगून आहे.

आपल्या उच्च समजल्या जाणाऱ्या हिंदु संस्कृतीचं हे एक क्लासिक उदाहरण म्हणायचं कि समाजाने लादलेल्या बंधनाने होणारा विपरित परिणाम म्हणायचा? उशिराका होईना पण तिला योग्य निर्णय घ्यायचे बळ आले.

पण त्यामुळे तिच्या मुलींवर विपरीत परिणाम झाला. उषानं लौकर घटस्फोटाचा निर्णय घेतला असता तर तिच्या मुलींचा पुरुष जातीविषयीचा ग्रह वेगळा झाला असता कां? थेरपी घेऊन त्यांचा पुरुष जातीविषयीचा दृष्टिकोन बदलू शकेल कां?

त्या काळांत लग्ने ठरवतांना पत्रिका पहाणे वगैरे सारख्या निरर्थक गोष्टींबरोबरच नवरा नवरीपेक्षा चार वर्षाने मोठा हवा, चार वर्षे जास्त शिकलेला हवा, चार इंच जास्त ऊंच हवा, व महिन्याला चार आंकडी पगार कमावणारा हवा, असा 'फॉर्म्युला ऑफ फोर' माहिती होता. पण कधीही, कोणीही संसार यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या ज्या चार सर्वात महत्वाच्या गोष्टी- त्या म्हणजे प्रेम, विश्वास, आदर व सुसंवाद (कम्युनिकेशन), यांचा उल्लेखही करत नसत.

मनुष्य आशेवर जगतो म्हणतात. पण माणसाच्या पेशन्सलाही कांही सीमा असते. अती पेशन्स दाखवला तर त्याला भित्रेपणाचे स्वरूप येते. तसंच तडजोड केल्याशिवाय संसार होत नाही, पण त्या तडजोडीलाही सीमा असते व ती दोन्ही बाजूने व्हावी लागते. सतत एकानेच ती करून कसे चालेल?

दोन व्यक्तिंची निरोगी वाढ होणं, उन्नती होणं हाच लग्नाचा, संसाराचा उद्देश असतो ना? नाहीतर केवढा तो वेळेचा, आणि शक्तीचा अपव्यय म्हणायचा? उषासारख्या कित्येक स्त्रिया असं परावलंबी जीवन जगतांना दिसतात. पण आपल्या संस्कृतीमध्ये स्त्रियांच्या पायात इतक्या अगणित बेड्या असतात, कि एकेक करत त्या सर्व तुटेपर्यंत पन्नाशी उलटून गेली तर नवल नसते.

स्वतःच्या संसारांत उषाला स्वातंत्र्य नव्हते, तिला स्वतंत्र आस्तित्व नव्हते. आता ती शंभर पटीने चांगले जीवन जगत आहे. **झाडाला विळखा घालून त्याच्या आधाराने वाढलेली वेल ही एकाच दिशेने वाढते, पण स्वतंत्रपणे वाढलेली वेल ही कशी सर्व दिशेने फोफावते, याचं हे उत्कृष्ठ उदाहरण.**

–सखी

---

या सदरासंबंधी पुढील पत्यावर संपर्क साधावाः
sakhishejarini@hotmail.com

या सदरासाठी आपले लिखाण पोस्टाने पाठवायचे असल्यास मजकूर लिहून पाकिटात बंद करावा , त्यावर for Sakhi असे लिहून ते पाकीट मोठ्या पाकिंटात घालून वृत्ताच्या पत्त्यावर पाठवावे.

**बृ. मंडळ अधिवेशनातील कार्यक्रम डीव्हीडीवर उपलब्ध**

**अॅटलांटा अधिवेशनातील कार्यक्रमांची झलक**
**प्रत्येकी दीड तासांच्या ३ डीव्हीडीवर**
**किंमत २५ डॉलर्स**

**ह्यूस्टन अधिवेशनातील खालील कार्यक्रम**
**क्षमा वैद्य– नाट्यसंगीत**
**१ तासाची डीव्हीडी – १० डॉलर्स**

**डॉ. विद्याधर ओक – हार्मोनियम – एक रसास्वाद**
**१ तासाची डीव्हीडी – १० डॉलर्स**

**समारोपाचा कार्यक्रम – मी विश्वाचा आहे**
**दिग्दर्शक – सुधीर मोघे, संगीत – आनंद मोडक**
**महाराष्ट्रातील नामांकित व्यक्तींच्या मुलाखती, भावगीत,**
**चित्रपट, नाट्यसंगीताच्या व्हिडिओ क्लिप**
**शिवाय ह्यूस्टनच्या कलाकारांनी घडवलेले महाराष्ट्र दर्शन**
**प्रत्येकी १ तासाच्या २ डीव्हीडी – १५ डॉलर्स**

**अधिक शिपिंग**
**ऑर्डर करण्यास १–८००–३००–६४३० फोन करा**


**Established in 1997, Saicon Consultants, Inc**. provides IT Professional Services to Fortune 500 companies nationwide. Saicon provides individualized attention to each of its client's needs and deploys the utmost quality through the right resources at the right time and for the right cost. Saicon is a M/WBE & SBA 8(a) certified that stands behind its qualified resources and services which is confirmed by its client satisfaction measurement process (SOAR). Saicon delivers flexibility in our services: Strategic Staffing / Staff Augmentation and End-To-End Solutions. Saicon provides low cost, highly qualified consultants to assist in: Proof of Concept, Implementation, Upgrade, Development, Support / Production Support.

We offer a variety of benefits tailored to meet your individual needs. At Saicon you'll become part of a fast-moving team, challenged daily with vital decisions

**Benefits: 401k, Employee Training Program, Health, Dental, Vision, Life Insurance, Short Term & Long Term Disability Insurance, Referral (1k – 3k) & Sign on Bonus (5k to 10k) DOE and Hourly option.**

**Sponsorship: H1-B, B1/L1, Green Card.**
**Join us today and become part of the SAICON TEAM!!!!**

Saicon
Consultants, Inc.

We deliver beyond expectation

**Head Quarter**
**Saicon Consultants, Inc.**
9300 West 110th Street Ste 650,
Overland Park, KS 66210
URL : www.saiconinc.com
Email: sci@saiconinc.com
Tel : 913-451-1178
Fax : 913-451-1126
Toll Free 1-866-SAICON1
**SBA 8(a) /SDB/WBE/MBE**

**Brach Office(s):**
**Saicon Consultants, Inc.**
101 North 10th Street Ste G-9
Forth Smith , AR 72901
Toll Free 1-866-SAICON1
E mail:sci@saiconinc.com

**Saicon Consultants,Inc**
1128 Cedar Valley Drive
Irving, TX 75063
Toll Free 1-866-SAICON1
Email:sci@saiconinc.com

**Pune, India ( Asia Office )**
**Saicon India Consultants, Ltd.**
112/4,Alandi road, Yerwada
Pune , India 411 006
Tel : 91-20-6693085 / 6611810
Fax : 91-20-6611810
Email: sci@saiconinc.com

# शेवटचे पान

पुण्या-मुंबईत लग्न समारंभांना उपस्थित राहणे याचा मला विशेष आनंद होतो. कारण अमेरिकेचे अनुकरण होत नाही अशापैकी अगदी थोड्या गोष्टी आता तेथे उरत आहेत आणि त्यातील लग्न समारंभ ही एक आहे.

आता बोलावण्यांपासून सुरूवात करू. पुण्या-मुंबईत एकच प्रथा दिसते. तुम्हाला एकतर बोलावणे असते किंवा नसते. बोलावणे असले तर 'लग्नाला सगळयांनी यायचं' - मामला खतम. मग तुमच्याकडे पाहुणे असोत, मित्र असोत, वधु-वरांशी तुमची ओळख नसो. सगळ्यांना घेऊन आलात तरी चालते. यांचे बजेट एवढे लवचिक कसे असा मला नेहमी प्रश्न पडतो. अमेरिकेत मात्र तुमचे नातेवाईकसुद्धा तुम्हाला लग्नाला बोलावतील की नाही याची खात्री नसते तर मित्रांकडील लग्न तर दूरच. तुमचे नाव 'ए' लिस्ट मध्ये आहे का 'बी' लिस्ट मध्ये यावर सगळे अवलंबून असते. 'ए' लिस्ट मधील लोकांनी काही कारणाने 'उपस्थित राहणे शक्य नाही' असे कळवले की मग 'बी' लिस्ट मधील लोकांना, ' सॉरी हं, तुम्हाला बोलावणे पाठवायला उशीर झाला' असे कारण सांगत बोलावणे पाठवले जाते. असे बोलावणे आले की माझ्या नेहमी मनात येते की 'नक्की येतो' असे कळवून आयत्या वेळी जाऊच नये. 'केटररलला माझे १०० डॉलर देताना कळेल, मी 'ए' लिस्टवर नाही काय?'

भारतात लग्न समारंभाला उपस्थित राहण्याचा बाऊ वाटत नाही. जरा बऱ्यापैकी शर्ट पॅंट घालावी व निघावे. कार्यालयात पोचल्यावर गर्दीत जो कोण ओळखीचा मित्र, नातेवाईक भेटेल त्याचेशी गप्पा माराव्या, खावे, प्यावे व निघावे. माझ्या गेल्या ट्रीपमध्ये तर एका संध्याकाळी मी तीन लग्नांना उपस्थित राहिलो. एक गोष्ट मात्र बदलली आहे. भारतातील लग्न आता कार्यालयात न होता ती 'लॉन्स' वर होतात. पुण्याला 'वटवृक्ष लॉन्स' म्हणून लग्नाचे प्रसिद्ध ठिकाण आहे म्हणे. त्या ठिकाणी ज्यांची लग्ने होतात त्यांचा घटस्फोट होत नाही अशी समजूत आहे.

अमेरिकेत लग्नाला जाण्याचा एवढा कंटाळा येतो. तो सूट घाला, लग्नाला वेळेवर पोचा, आणि तो लग्न समारंभ मुकाटपणे पहा. सध्या माझे अनेक निवृत्त मित्र पौरोहित्याच्या धंद्यात पडले आहेत. हे पुरोहित, मित्रांनी त्यांना ओळखू नये म्हणून चक्क पुणेरी पगडी घालतात, उपस्थित अमेरिकनांना भारतीय लग्न विधि समजावेत म्हणून इंग्रजीत पत्रक काढतात. ते वाचूनच हे दुसऱ्या पिढीतील वर रामदासांसारखे लग्नमंडपातून पळून कसे जात नाहीत याचेच मला आश्चर्य वाटते. शिवाय हे लग्न समारंभ म्हणजे दोन संस्कृतीचा मिलाप करण्याचा सर्व वधूंनी व आयांनी चंग बांधलेला असतो. मग लग्नाअगोदर वर घोड्यावरून येतो (अशावेळी कारण नसताना मला एखाद्या वेस्टर्न सिनेमातील काऊबॉय आठवतो व कोणी जर एकदम बंदुकीच्या दोन चार फैरी हवेत उडवल्या तर त्या घोड्यावरील वराची काय स्थिती होईल याची कल्पना करवत नाही). नातेवाईकांची, फ्लॉवर गर्ल्सची मिरवणूक निघते. ती मिरवणूक मी लहान असताना ग्रेट रॉयल सर्कसमधील रिंगणात सर्कसमधील सर्व कलाकार चक्कर मारीत असत तशी वाटते.


परदेशातील भारतीयांसाठी एक खास योजना

डीएसके उद्योगसमूह आणि बृहन महाराष्ट्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने

DSK & BMM matrubhumi

परदेशस्थ मराठी बांधवांसाठी एक खास योजना

अमेरिकेतील अनेक मराठी कुटुंबं महाराष्ट्रात घर घेतात. काही जण गुंतवणूक म्हणून घेतात, काही निवृत्तीनंतरच्या वास्तव्यासाठी घेतात तर काही मायदेशी राहणाऱ्या आप्तांसाठी घेतात.

परदेशात स्थित असलेल्या भारतीयांशी वेळो वेळी होत असलेल्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भेटी, जवळपास प्रत्येक देशात आपल्या प्रतिनिधींद्वारे होणारा जनसंपर्क आणि याही पलिकडचं 'आपले'पणाचं, एकाच मातीनं जडलेलं एक अदृश्य आणि अतूट नातं. या सगळ्यातून एक भावबंध तयार झालाय. या भावनेपोटी आम्ही बृहन महाराष्ट्र मंडळाच्या सहयोगाने आमच्या रौप्य महोत्सवी वर्षात एक अभिनव योजना सादर करीत आहोत.. खास आपल्यासाठी !

**या खास योजनेद्वारे आपणांस कुठल्याही डीएसके गृहप्रकल्पांत घर घेतल्यास त्या जागेच्या दरात रु.२१ हजार ते रु.५१ लाखापर्यंत* खास सवलत मिळेल.**

सुंदर घरांची निर्मिती करणारं लोकप्रिय नांव

* नियम व अटी लागू. या योजनेत फेरबदल करण्याचे सर्व हक्क DSKDL कडे राखीव.

SETU 11/05

DSK घराला घरपण देणारी माणसं

डी.एस.कुलकर्णी डेव्हलपर्स लि.

पुणे : डीएसके हाऊस, जंगली महाराज रोड, पुणे 411 005. फोन :56047100 टेलि-इन्फोसाठी :5604 7181

मुंबई : 14, उपासना, सेनाभवनाशेजारी, शिवाजी पार्क, मुंबई 400 016. फोन : 2432 43 28

E-mail : sales@dskdl.com Web-Site : www.dskdl.com

PBAP MEMBER

2nd FASTEST GROWING CONSTRUCTION COMPANY IN INDIA

भारतीय पद्धतीने लग्न - पण कुणालाच मांडी घालून बसणे शक्य नसल्याने वधू-वर त्यांचे आई वडील खुर्च्यावर, होम मात्र जमीनीवर. तो होम सुद्धा त्यांच्या समोर एका टेबलावर का ठेवत नाहीत असा माझ्या मनात विचार येतो. सर्वात कहर होतो सप्तपदीतील प्रत्येक स्टेपचा अर्थ हे पुरोहित इंग्रजीतून सांगतात तेव्हां (व उपस्थित गोरे लोक तो समजला म्हणून माना डोलावतात). जे काय चालले आहे ते सर्व समजायलाच हवे हा आग्रह का तेच मला कळत नाही. माझ्या लग्नात भटजी संस्कृतमधून काय सांगत होते ते मला कुठे कळत होते आणि त्या भटजींचा तसा आग्रह नव्हता. लग्नानंतर जेवण व दक्षिणा यावर फक्त त्यांचा डोळा होता. त्यावेळी बायकोचा हात धरून सात पावलेच काय मेरी गो राऊंडसारखे एक तास गोल गोल फिरायचीसुद्धा माझी तयारी होती. लहानपणी अक्षता पडल्या म्हणजे आता पेढे मिळणार तसे अमेरिकेतील समारंभात एकदा लग्न लागले म्हणजे उत्तेजक पेयांची वेळ झाली म्हणून मला आनंद होतो.

भारतातील लग्नात त्या लॉन्सच्या बाहेर येथे कोणाचे लग्न आहे याची मोठी पाटी झळकत असते त्यामुळे तुम्ही भलत्याच लग्नात शिरण्याची शक्यता नसते. या पाट्यांची जरूरीच असते कारण आत शिरताच फारच थोडे लोक तुमच्या ओळखीचे असतात. लॉन्सवरील असंख्य खाद्यपदार्थांच्या टेबलांवरून विविध खमंग वास येत असतात. मला लगेच तिकडेच मोर्चा वळवायचा असतो पण नाईलाजाने मुख्य स्टेजजवळ वधु-वर व त्याचे आई वडील यांना भेटण्यासाठी पोलीसांच्या लाईनअप सारखी लाईन लागलेली असते तेथे मी नंबर लावतो. मी पोलीसांची लाईनअप यासाठी म्हणतो की स्टेजवर पोचताच 'मी कोण ओळखा पाहू?' हा खेळ सुरू होतो. बहुतेक उपस्थित मंडळी वधुवरांच्या ओळखीची नसतात. त्यामुळे त्यांची नातेवाईक मंडळी ओळख करून द्यायला लागतात -

'अरे हे आमच्या ऑफिसातले हेड क्लार्क कर्वे'
'नाही माझे नाव बर्वे'
'हो बरोबर, मी कसा विसरेन'

अशा प्रकारे ही ओळख परेड सुरू होते. मग स्टेजवरील व्यक्तीच्या थोरपणाच्या वर्गीकरणाप्रमाणे फोटोग्राफरला फोटो काढण्याची ऑर्डर सुटते. आई वडीलांच्या नजरेच्या इशाऱ्याप्रमाणे वधुवर वाकून नमस्कार करतात. व्हिडीओ घेणारा माणूस फक्त सुंदरींना टिपण्यात मग्न असतो. बाकीच्यांना प्रभादेवी गणपती मंदिरामध्ये देवासमोर पोचताच नमस्कार होण्यागोदरच 'चला पुढे' म्हणून ढकलले जाते तसे स्टेजवरून खाली उतरविण्याची घाई केली जाते.

अमेरिकेतील लग्न लागले की बालगंधर्व रंगमंदिराच्या तिकीट खिडकीवर झुंबड उडते तशी आपले टेबल कुठले हे पाहण्यास रांग लागते. आपल्या टेबलावरील सर्वजण आपल्या ओळखीचेच आहेत, उगाच नवीन व्यक्तीला भेटून त्याची ओळख करून घेण्याचे कठीण काम आपल्याला करावे लागणार नाही याची खातरजमा झाल्यावरच उपस्थित मंडळी स्नॅक्सचा समाचार घेतात. भारतात जेव्हां बफे पद्धत नव्हती तेव्हां पंगतीत नंबर लावणे हे एक दिव्य असायचे. आता बफे पद्धतीमुळे ती अडचण दूर झाली आहे. अमेरिकेत पंगतीत नंबर लावायचा नसतो. पण जेवणाअगोदरचे इतर समारंभ पाहण्याची शिक्षा असते अथवा तुमच्या मनाविरूद्ध त्यात सामील व्हावे लागते.

तो डीजे 'गिव्ह देम अ बिग हँड'चा सपाटा लावतो. मग शॅंपेन टोस्ट नंतर नातेवाईकांची व वधुवरांच्या मित्रांची भाषणे ऐकावी लागतात. (ते काय बोलत आहेत हे त्या दोघांनाच ठाऊक असते). आपल्यात वेडिंग रिहर्सलची पद्धत आता हळूहळू रूढ होत चालली आहे. ही भाषणे ऐकली की कमीत कमी त्याची तरी रिहर्सल हवी असे वाटते. मग विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाला सामोरे जावे लागते. कुटुंबात मुलींची संख्या जेवढी जास्त तेवढ़ी नाचांची संख्या वाढत राहते. काही जण मोठ्या पडद्यावर वधूवर रांगत असल्यापासूनचे फोटो दाखवतात. त्यानंतर वधुवरांचा पहिला एकत्र नाच पाहण्याची सक्ती होते. तो नाच पाहून ते चांगले रांगत होते असे माझे स्पष्ट मत बनते. मग वर आणि वराची आई, वधु आणि तिचा पिता अशा नाचाच्या जोड्या पडतात. सबंध रात्र उपस्थितांमधून अशा चिठ्ठ्या टाकून नाच करण्याची एक गेम ठेवावी त्यामुळे उपस्थितांची जास्त करमणूक होईल असा विचार माझ्या मनांत येतो.

लग्न म्हणजे उत्तम जेवण या माझ्या लहानपणच्या समजुतीला अमेरिकेत एकदम धक्का बसला आहे. पंजाबी जेवणाचे सगळीकडे वर्चस्व, कोठेही जा, तोच मेनु तीच चव, डिशेस लहान ज्यात सर्व पदार्थ मावतही नाहीत, बफे असला तरी परत जाण्याची संधी मिळत नाही या उलट भारतात आजकाल रिसेप्शन्स मधील डिशेसचा आकार पाहिला आहेत का? डिशेस कसल्या मोठ्या ढालीच त्या. कितीतरी पदार्थ. कोणत्याही प्रकारचे पदार्थ हवे तेवढे घ्या. अगदी इच्छा भोजनच ते. आणि एवढे असून गिफ्ट आणू नका अशी नम्र विनंती (अगदी पुष्पगुच्छसुद्धा नको). वा वा काय औदार्य. याउलट अमेरिकेत 'आम्हाला काय हवे' याचे लग्नाच्या निमंत्रणाबरोबर वॉरंटच येते.

अमेरिकेत जेवण झाल्यावर डीजेने पंजाबी गाण्यांचा धुमाकुळ सुरू केला की माझा संयम संपतो. टेबलावर खास उपस्थितांसाठी ठेवलेली गिफ्टची बॉक्स घेऊन मी घरचा रस्ता धरतो. त्या बॉक्समध्ये गणपती नंबर १३१ आहे याची मला खात्री असते म्हणून मी घरी आल्यावर तो बॉक्स उघडतसुद्धा नाही. एक दिवस स्मिथसोनियन संग्रहालयाला मी ते गणपती भेट देऊन टाकणार आहे. मग सहा महीन्यांनी वधु वरांकडून 'काका तुमच्या गिफ्टबद्दल धन्यवाद' हे कार्ड येते तेव्हां त्याच जोडप्याची बेबी शॉवरची तयारी सुरू झालेली असते.

'वेडिंग क्रॅशर्स' हा सिनेमा मी नुकताच पाहिला. अमेरिकेत असे घडणे शक्य आहे का याबद्दल मला शंका आहे. मात्र भारतात हे सहज शक्य आहे. चित्रपट आवडला तर त्याच्या कल्पनेचा समाजहितासाठी उपयोग करावा असे मनात येऊन मी 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला एक प्रकल्प सादर करण्याचा विचार करीत आहे. भारतात एक सेवादायी संस्था सुरू करून रस्त्यावरील भिकाऱ्यांना गोळा करून त्यांना आंघोळ करण्याची सोय उपलब्ध करून देणार, चांगले कपडे पुरविणार आणि नीट पढवून माझ्या व्हॅनमधे घालून लग्नाची रिसेप्शन्स होतात त्या लॉन्सच्या जवळ नेऊन सोडणार. काही वेळाने त्या लॉन्सवरील चाट, इंडियन चायनीज, पंजाबी डिशेस यांचा भरपूर आस्वाद घेऊन ते लोक समाधानी चेहेऱ्याने बाहेर पडताना दिसतील तेव्हां व्हॅनमध्ये बसल्याबसल्याच माझे पोट भरले असेल.

मोहन रानडे
editorbmm@yahoo.com

बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-800-300-6430 to pay by credit card. Master Card, Visa, American Express and Discover is accepted.*


**SAVE DISABLED CHILDREN THRU FREE PLASTIC SURGERY**





**PLEASE DONATE GENEROUSLY TO DR. DICKSHEET'S INDIA PROJECT**
**WWW.DRDICKSHEET.ORG**

**135 OCEAN PARKWAY 17C**
**BROOKLYN, NY 11218**
**PH. 718 633 1449 or 727 868 1667**
**E mail: murphy.pianoman@att.net**
***YOUR DONATION OF $150 CAN SAVE ONE CHILD***





**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

- **VISITORS**
- **H-1 B VISA HOLDERS**
- **PERMANENT RESIDENTS**

**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939
Fax : (706)860-7268
E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com